**नि. फौ. ख. क्र.२२९/२०२१**

सरकार वि. शिवाजी जगताप

**नि.क्र.१३**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

**<u>माझे नाव– रोहन दत्तात्रय इंगवले ,</u>**

वय– ३९ वर्षे, नेमणूक – वनपाल,

रा.भोर, ता.भोर, जि.पुणे.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. पी. कुचेकर, यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

२०१८ ते २०२० या कालावधीत वन परिक्षेत्र इंदापूर येथे वन रक्षक पळसदेव म्हणून मी कार्यरत होतो. त्यावेळी माझ्या अखत्यारीत डाळज नं.३ हे गाव होते. त्यात फॉरेस्ट सर्व्हे नं.६५ त्याचा गट नं.१९२ मध्ये शिवाजी जगताप यांना वाटप क्षेत्रात राखीव वनात विना परवाना मोबाईल टावर उभा केला. त्यानंतर मी त्यावर वन गुन्हा दाखल केला. घटनेची हकीकत वरिष्ठांना कळविली. आता मला मी दिलेली पी.ओ.आर. दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.१४</u>** देण्यात येते. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री.पी.डी.जगताप, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

२. सर्व्हे नं.६५ मध्ये डाळज नं.३ गाव वसलेले आहे. शासनाने गट नं.६५ मध्ये लोकांना भुखंड वाटप केलेले आहे. गट नं.६५ च्या उता–याला राखीव वन अशीच नोंद आहे. गट नं.६५ हा जास्त क्षेत्राचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.६५ मध्ये हद्दीबाबत वाद आहेत. आरोपीच्या आईला गट नं.१९२ मधील क्षेत्र वाटप झालेले आहे. तेच क्षेत्र आरोपीला वारसाहक्काने मिळाले. एकूण ४ हे. ५ आर एवढे क्षेत्र आरोपीला वाटप

झालेले आहे. आरोपीला वाटप झालेल्या क्षेत्रात त्याने टावर उभा केलेला आहे. आरोपीने टावर उभारण्यासाठी महसूल विभागाच्या परवानग्या घेतल्या होत्या का कसे मला माहिती नाही. टावर कधीपासून तेथे उभा होता ते मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, राजकीय दबावातून केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणताही गुन्हा केलेला नाही.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.०१/११/२०२५**